अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## अंबाबाई देवीचे दर्शन दोन दिवस राहणार बंद

**कोल्हापूर :** भारतीय पुरातत्व विभागाच्या वतीने करवीरनिवासिनी अंबाबाई देवीच्या मूर्तीचं दोन दिवस संवर्धन करण्यात येणार आहे. त्यामुळे दिनांक १४ आणि १५ एप्रिल रोजी देवीचं दर्शन बंद राहणार आहे. भाविकांना दर्शनासाठी पितळी उंबऱ्याच्या बाहेर कलश आणि उत्सवमूर्ती दर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीने ही माहिती दिली आहे.

करवीरनिवासिनी श्री अंबाबाई मूर्तीची झीज झाल्याने तातडीने संवर्धन करण्याची गरज असल्याचा निष्कर्ष तज्ज्ञांनी दिला आहे. मूर्ती संवर्धनासंबंधीचा दावा दिवाणी न्यायाधीश यांच्यासमोर सुरू आहे. न्यायालयीन आदेशानंतर पुरातत्त्व खात्याचे निवृत्त अधिकारी आर.एस. त्र्यंबके आणि विलास मांगीराज यांनी १४ आणि १५ मार्च रोजी केलेल्या पाहणीचा अहवाल न्यायालयात सादर केला होता.अहवालानुसार भारतीय पुरातत्त्व विभागाच्या वतीने करवीर निवासी श्री अंबाबाई देवीच्या मूर्तीचे संवर्धन दिनांक १४ आणि १५ एप्रिल रोजी करण्यात येणार आहे. यादरम्यान भाविकांना देवीच्या मूळ मूर्तीचे दर्शन घेता येणार नाही. त्यामुळे भाविकांना दर्शनासाठी पितळी उंबऱ्याच्या बाहेरून कलश आणि उत्सव मूर्तीचे दर्शन घेता येणार आहे.





## अयोध्या मंदिरात दिले सोन्याचे रामचरित्रमानस

**नवी दिल्ली :** राम मंदिराचा प्राणप्रतिष्ठा सोहळा झाला. देशभरातून नाही तर जगभरातून राम मंदिरासाठी भाविक देणग्या देत आहेत. आता राम मंदिरासाठी एका भाविकाने सोन्याचे राम चरित्रमानस भेट दिले आहे. मध्य प्रदेशातील माजी आयएएस अधिकारी सुब्रह्मण्यम लक्ष्मी नारायण यांनी राम मंदिर ट्रस्टला ही भेट दिली आहे. अयोध्येतील राम मंदिरात चैत्र नवरात्रीच्या मुहूर्तावर मंगळवारी या रामचरित्रमानसची स्थापना करण्यात आली. त्याचे दर्शन भाविकांना घेता येणार आहे.

मध्य प्रदेशातील कॅडरचे माजी आयएसए अधिकारी सुब्रमण्यम लक्ष्मीनारायण आणि त्यांची पत्नी सरस्वती यांनी भेट दिलेली रामचरित्रमानसच्या ताम्रपत्रावर सोन्याच्या अक्षरे आहेत. ही रामचरितमानस रामलल्लांच्या गर्भगृहात ठेवण्यात आले आहे. विधीपूर्वक त्या रामचरित्रमानसची पूजा करण्यात आलीय. ही रामचरित्रमानस एक हजार पानांची आहे. त्याची किंमत पाच कोटी रुपये आहे.

माजी आयएसए अधिकारी सुब्रमण्यम लक्ष्मीनारायण आणि त्यांची पत्नी सरस्वती यांनी भेट दिलेली रामचरित्रमानस

अल्ट्राव्हायोलेट प्रिंटींग तंत्रज्ञानाचा वापर करुन सोन्याच्या पानांवर रामचरित्रमानसमधील मजकूर लिहिला गेला आहे. त्याची निर्मिती चेन्नईच्या बुममंडी बंगारु ज्वेलर्सकडून करण्यात आली. या रामचरित्रमानसची निर्मिती करण्यासाठी सुमारे आठ महिन्यांचा कालावधी लागला. या रामचरित्रमानसचे वजन १.५ क्विंटल आहे. त्यात १० हजार ९०२ खंड आहे.

## आसाममध्ये शिवाजी महाराजांचा पुतळा
## चीनच्या सीमेवर २१ पॅरा स्पेशल फोर्समध्ये अनावरण

**सातारा/प्रतिनिधी**

साताऱ्यातील एका सुपुत्राने जम्मू काश्मीरात भारतीय सैन्य दलाच्या केंद्रात सर्वप्रथम उभारलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यानंतर आता आसाममध्ये सैन्य दलाच्या केंद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारला असून, त्याचे नुकतेच अनावरण झाले आहे. ही बाब सातारा जिल्ह्याच्या दृष्टीने अभिमान व गौरवाची ठरली आहे.

भोसे (ता. कोरेगाव) येथील लेफ्टनंट कर्नल अमित विजय माने यांनी पुढाकार घेत आपल्या सहकाऱ्यांसह जम्मू काश्मीरात कुपवाड्यामध्ये ४१ राष्ट्रीय रायफल्स (मराठा लाईट इन्फंट्री) बटालीयनमध्ये सात नोव्हेंबर २०२३ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारला आहे. त्याचे अनावरण राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार आदींनी तेथे जाऊन समारंभपूर्वक केले आहे. छत्रपती शिवाजी महाराज व त्यांच्या स्वराज्याचा सार्थ अभिमान बाळगणाऱ्या नागठाणे (ता. सातारा) येथील रविराज नलवडे यांनी पुढाकार घेत आसाममध्ये सैन्य दलाच्या केंद्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ



पुतळा उभारला आहे.

चीनच्या सीमेवर आसाममधील जोहाट येथे भारतीय सैन्य दलाच्या २१ पॅरा स्पेशल फोर्स

> **जवानांना प्रेरणा मिळेल**
>
> आसामध्ये उभारलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्यामुळे भारतीय सैन्य दलात कार्यरत अधिकारी, जवानांना जशी प्रेरणा मिळेल तद्वतच पुतळ्यामुळे शत्रूवर कायम दहशत राहील.
>
> – **हरजितसिंह साही**, लेफ्टनंट जनरल

मराठा २१ युनिटचे कमान अधिकारी कर्नलपदी रविराज नलवडे (सेना मेडल) हे कार्यरत आहेत. त्यांनी व पूर्वोत्तर सीमेवर संरक्षणार्थ तैनात असलेल्या मराठासह इतर युनिटमधील अधिकारी, जवानांनी एकत्र येत शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारण्याचा संकल्प केलेला होता. त्यानुसार सर्वांनी स्वनिधीमधून पुतळा आणून, संरक्षक दलाची परवानगी वगेरे बाबी पूर्ण करून युनिटमध्ये शिवाजी महाराजांचा पुतळा उभारला आहे.


या पुतळ्याचे अनावरण नुकतेच लेफ्टनंट जनरल हरजितसिंग साही यांच्या हस्ते झाले. त्यांनी प्रथम रविराज नलवडे यांचा पुढाकार व त्यांच्या सहकाऱ्यांच्या पुतळा उभारणीतील यशस्वी योगदानाचे कौतुक केले.

## लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी जामीन द्या
### सिसोदियांची कोर्टात मागणी

**नवी दिल्ली**

लोकसभा निवडणुकीचा प्रचार करण्यासाठी हंगामी जामीन दिला जावा, अशा विनंतीची याचिका दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांनी विशेष न्यायालयात दाखल केली आहे. दरम्यान, याचिकेची दखल घेत न्यायालयाने सीबीआय आणि ईडीला नोटीस बजावत उत्तर सादर करण्यास सांगितले आहे.

गैरव्यवहारातून मिळालेला पैसा पद्धतशीरपणे इतरत्र वळविण्यात आला असल्याचेही तपास संस्थांचे म्हणणे आहे. गैरव्यवहारात सामील असल्याचा आरोप करीत सीबीआयने फेब्रुवारी २०२३ मध्ये सिसोदिया यांना अटक केली होती. यानंतर २८ फेब्रुवारी २०२३ रोजी सिसोदिया यांनी



उपमुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला होता. सीबीआयनंतर ईडीने सिसोदिया यांना अटक करत त्यांची चौकशी केली होती. सिसोदिया यांच्या याचिकेची दखल घेत विशेष न्यायालयाच्या न्यायाधीश कावेरी बावेजा यांनी ईडी आणि सीबीआयला नोटीस बजावली आहे. नोटिशीवर २० तारखेपर्यंत उत्तर देण्यास सांगण्यात आले आहे.

## वर्षा गायकवाड घेणार कॉँग्रेस हायकमांडची भेट

**मुंबई/प्रतिनिधी**

महाविकास आघाडीमध्ये जागा वाटपांवरुन अंतर्गत धुसफूस पाहायला मिळत आहे. सांगली आणि मुंबईतील जागा वाटपावरुन काँग्रेसमधील नाराजी दूर झालेले नाही. मुंबईमधील जागा वाटपाबाबत पक्षाने विचारात घेतले नसल्याचे सांगत मुंबई काँग्रेस अध्यक्षा वर्षा गायकवाड यांनी जाहीर नाराजी व्यक्त केली होती.



अशातच आता वर्षा गायकवाड यांनी दिल्लीमध्ये पक्षश्रेष्ठींची भेट घेणार असल्याचे सांगितले आहे.

> **उत्तरमध्य मुंबईतून उमेदवारी मिळणार?**
>
> उत्तर मध्य मुंबईतून वर्षा गायकवाड यांना उमेदवारी मिळण्याची दाट शक्यता आहे. वर्षा गायकवाड यांच्या उमेदवारीबाबत चाचपणी सूरू असल्याची माहिती समोर आली आहे. त्याचबरोबर या जागेवरुन माजी आमदार नसीर खानही लढण्यास इच्छुक आहेत. त्यामुळे आता पक्षश्रेष्ठींसोबत चर्चेनंतर काय निर्णय होणार, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

माननीय उद्धव ठाकरे, शरद पवार तसेच मल्लिकार्जुन खरगे साहेब यांच्याशी आमचा नेहमी संपर्क असतो. मल्लिकार्जुन खरगे आमच्या पक्षाचे प्रमुख आहेत. आमचे काही प्रश्न आहेत या संदर्भात आम्हाला दिल्लीला जायचं आहे. मात्र मल्लिकार्जुन खरगे हे उमेदवारी अर्ज भरायला गुलबर्गा या ठिकाणी गेले आहेत, 'त्यामुळे त्यांची वेळ मिळताच आम्ही दिल्लीला जाणार आहे, असे वर्षा गायकवाड यावेळी म्हणाल्या.

त्याचबरोबर येणाऱ्या काळात आम्ही महाविकास आघाडी म्हणून कामाला सुरूवात करणार आहोत. मुंबईतील सहाही जागांवर महाविकास आघाडीचे उमेदवार कसे निवडून येतील, यासाठी प्रयत्न करु. तसेच त्यासाठी काँग्रेसकडून सर्वतोपरी सहकार्य करु, असेही वर्षा गायकवाड यावेळी म्हणाल्या.

## राम सातपुतेंना निवडून आणण्याचा निर्धार
### होटगीसह अनेक गावातील काँग्रेस महिलांचा भाजपात प्रवेश

**सोलापूर/प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीतील भाजप विरुद्ध काँग्रेस असा राजकीय संघर्ष वाढत चालला आहे. बुधवारी काँग्रेस पक्षासह विविध संस्था, संघटनांमध्ये कार्यरत असणाऱ्या अनेकांनी भाजपमध्ये प्रवेश करत काँग्रेसला धक्का दिला. महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते, माजी सहकारमंत्री सुभाष देशमुख बुधवारी दक्षिण सोलापूर विधानसभेच्या प्रचार दौऱ्यावर होते.

यावेळी राम सातपुते आणि सुभाष देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत होटगी येथील काँग्रेसच्या उषादेवी दत्तात्रय चाबुकस्वार यांच्यासह अन्य महिलांनी भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला.



**होटगी : दक्षिण सोलापूर तालुक्यातील काँग्रेसच्या महिला आमदार सुभाष देशमुख आणि लोकसभेचे उमेदवार राम सातपुते यांच्या उपस्थितीत भाजपात प्रवेश करताना.**

भाजप व महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते यांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणण्याचा निर्धार यावेळी महिलांनी व्यक्त केला.

तसेच यत्नाळ येथील लक्ष्मी स्वामी, भाग्यश्री कामशेट्टी, होटगीतील रामेश्वरी औटगे, सुजाता तळळे, बोरुळमधील अनिता गायकवाड, निगव्वा चिमेकर, शिरवळ गावातील सपना जवळगी, होटगी स्टेशनमधील सविता सुकाळे, मीनाक्षी निंबाळकर, वैशाली ढेरे, शुभांगी डांगे तर कणबसमधील सिद्धम्मा स्वामी, अश्विनी स्वामी, विजयालक्ष्मी चिट्टे, राणी चिट्टे, भौरम्मा अविनाळे यांनीही भारतीय जनता पार्टी प्रवेश केला.

## मासिक पाळीदरम्यान विद्यार्थिनिंना मिळणार सुट्टी

**चंदीगड :** मासिक पाळीदरम्यान अनेक मुली आणि महिलांना प्रचंड त्रास होतो. या काळामध्ये आरामाची गरज असते. या काळात शाळा, कॉलेज आणि जॉबला सुट्टी मिळावी असे अनेकांना वाटते. अशामध्ये चंदीगडमधील पंजाब युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थिनींना मोठा दिलासा मिळाला आहे.

युनिव्हर्सिटीने मासिक पाळीदरम्यान विद्यार्थिनींना सुट्टी देण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. पंजाब युनिव्हर्सिटीच्या या निर्णयाचे विद्यार्थिनिंनी स्वागत केले आहे.

पंजाबमध्ये हे पहिल्यांदा होत आहे जेव्हा एखादी युनिव्हर्सिटीने Menstrual Leave साठी पुढाकार घेतला आहे. याबाबतची माहिती देणारे परिपत्रक युनिव्हर्सिटीद्वारे जारी केले असले तरी युनिव्हर्सिटीने याबाबत काही अटी देखील घातल्या आहेत. ही सुट्टी फक्त एका दिवसासाठी दिली जाईल. सुट्टी घेण्यासाठी विद्यार्थिनींना आधी विभागीय कार्यालयात उपलब्ध असलेला फॉर्म भरावा लागेल.

## सुनेत्रा पवारांच्या बॅनरवर राज ठाकरेंचा फोटो

**पुणे :** बारामतीत महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवारांच्या प्रचार पत्रकावर आणि बॅनरवर मनसे अध्यक्ष राज ठाकरेंचे फोटो छापण्यात आलेयत. मोदींना बिनशर्त पाठिंबा जाहिर केल्यानंतर महायुतीच्या उमेदवारांकडून राज ठाकरेंचे फोटो बॅनरवर छापण्यात आलेयत. बॅनरवर पंतप्रधान मोदी, मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री फडणवीस, अजित पवारांसोबत आता राज ठाकरेंचादेखील फोटो लावण्यात आलाय.

बारामतीपूर्वी वाशिममधील राजश्री हेमंत पाटील यांच्या प्रचार बॅनरवरही राज ठाकरेंचा फोटो झळकला आहे. प्रचारसभेत राज ठाकरेंचा फोटो दिसल्यानंतर अनेकांच्या भुवया उंचावल्यात. गुढीपाडवा मनसे मेळाव्यातून राज ठाकरे यांनी महायुतीला बिनशर्त पाठिंबा देण्याच जाहीर केलं. त्यावेळी राज ठाकरे म्हणाले की, मी सगळ्या गोष्टींकडे बारकाईने पाहतो आलो आहे. पुढच्या पाच वर्षांसाठी काही गोष्टी कराव्या लागणार आहे. देवेंद्र




फडणवीस यांना मी सांगितलं की, राज्यसभा नको कि विधान परिषद नको पण देशाला खंबीर द्या. महाराष्ट्र नवनिर्माण सेना भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी यांना फक्त नरेंद्र मोदींसाठी बिनशर्त देत असल्याचा घोषणा राज ठाकरेंनी शिवाजी पार्कातून केली.

राज ठाकरे यांनी नरेंद्र मोदीसाठी का होई ना महायुतीला पाठिंबा दिला. त्यामुळे अजित पवार यांनी महायुतीतील काही जांगाबद्दल तिढा असल्याचं बोलले जात आहेत.

## देशमुख पिता-पुत्राचा शहर उत्तरमध्ये 'होम टू होम' प्रचार

- **आमदार राम सातपुते यांच्या प्रचाराला वेग**
- **भाजपची प्रचार यंत्रणा गतिमान**

**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर लोकसभा निवडणुकीतील महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते यांच्या प्रचारार्थ, आमदार विजयकुमार देशमुख आणि त्यांचे सुपुत्र माजी नगरसेवक डॉ. किरण देशमुख यांनी शहर उत्तर विधानसभा मतदारसंघातील प्रभाग क्रमांक दोन मध्ये 'होम टू होम' प्रचार केला. घरोघरी जाऊन, पत्रके वाटून उमेदवार आमदार राम सातपुते यांना विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले.




**सोलापूर : शहर उत्तर मतदार संघातील प्रभाग दोन मध्ये भाजपचे उमेदवारी राम सातपुते यांचा होम टू होम प्रचार करताना आमदार विजयकुमार देशमुख, माजी नगरसेवक डॉ.किरण देशमुख आदी.**

बनशंकरी नगर, शिवसृष्टीनगर, महेश थोबडे नगर आदी भागात होम टू होम प्रचार करत सत्ताधारी भाजप पर्यायाने देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाठिशी मतांची ताकद लावणे का हिताचे आहे, याबद्दल मतदारांना पटवून सांगितले.

यावेळी भाजपाचे शहर सरचिटणीस प्रा. नारायण बनसोडे, तसेच प्रकाश हत्ती, कल्पना कारभारी, शालन शिंदे, चंद्रकांत रमणशेट्टी, शंकर शिंदे, ज्ञानेश्वर कारभारी, धोंडप्पा वग्गे, राष्ट्रवादीचे प्रकाश जाधव, आरपीआयचे युवा नेते उमेश उबाळे, गुरूनाथ वांगीकर, नागेश उंबरजे, धरीराज रमणशेट्टी, उद्योजक प्रमोद मोरे, उमेश कोळेकर, राहुल शबादे, मल्लू कोळी, विशाल शिंदे, ऋषीकेश कुलकर्णी आदि उपस्थित होते.

### तिसरा डोळा
– प्रकाश पोरे



सध्या तरी मित्र आहेत !

कल्याण
600-64-347
मुंबई
250-79-289

## 'वंचित'ला मतदान करु नका : तुषार गांधी
### प्रकाश आंबेडकर व एमआयएम दोघेही भाजपची 'बी टीम' असल्याचा आरोप

**पुणे/प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीत उमेदवारांनी प्रचाराला सुरुवात केली आहे. लोकसभेच्या या निवडणुकीत उमेदवारांनी सभांचा धडाका लावला आहे. या लोकसभा निवडणुकीत अकोला मतदारसंघातील निवडणुकीकडेही सर्वांचं लक्ष लागलं आहे.

या लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीत मोठा ट्विस्ट आला आहे. या लोकसभा मतदारसंघात प्रकाश आंबेडकर यांच्या विरोधात तुषार गांधी मैदानात उतरले आहेत.

अकोला लोकसभा मतदारसंघात निवडणुकीत वेगळा ट्विस्ट समोर आला आहे. या मतदारसंघात आंबेडकर विरुद्ध गांधी एकमेकांच्या समोर उभे ठाकले आहेत. प्रकाश आंबेडकर यांच्या विरोधात तुषार गांधी मैदानात उभे ठाकले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नातू प्रकाश आंबेडकर यांच्या विरोधात महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी मैदानात उभे ठाकले आहेत. 'वंचित बहुजन



आघाडीला मतदान कर नका. प्रकाश आंबेडकर आणि त्यांच्या उमेदवारांना मतदान करू नका, असं आवाहनही तुषार गांधी यांनी केला आहे.

वंचित भाजपची बी टीम, एमआयएम देखील भाजपची बी टीम आहे, असा तुषार



गांधी यांचा आरोप आहे. महाराष्ट्रातील मतदारांना आवाहन करण्यासाठी तुषार गांधी यांच्याकडून प्रोग्रेसिव महाराष्ट्र मंचची स्थापना केली. महाविकास आघाडीला मतदान करा, महायुतीला मतदान करु नका हे आवाहन करण्यासाठी प्रोग्रेसिव महाराष्ट्राची स्थापना करण्यात आली आहे.

अनेक सामाजिक कार्यकर्ते, साहित्यिक, चित्रपट कलावंत यांचा प्रोग्रेसिव महाराष्ट्राच्या भूमिकेला पाठिंबा आहे. तुषार गांधी या मंचाच्या माध्यमातून राज्यभर फिरुन मतदारांना आवाहन करणार आहेत.

तसेच सोशल मीडियावरुन मतदारांना आवाहन करणार आहेत. महायुती बरोबरच वंचित, एमआयएमला देखील मतदान न करण्याचे आवाहन करणार आहेत.

## पियुष गोयल यांच्याविरोधात वंचितकडून उमेदवारी
### राजकीय समीकरणे बदलणार

**मुंबई/प्रतिनिधी**

लोकसभेच्या सहापैकी अवघ्या दोनच जागांवर महायुतीकडून उमेदवार जाहीर करण्यात आले आहेत. यातील उत्तर मुंबईच्या जागेवर केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. पियुष गोयल यांच्याविरोधात वंचितकडून विनासिंग यांना निवडणुकीच्या रिंगणात उतवलं आहे.

लोकसभा निवडणुकीच्या आतार्यंतच्या इतिहासात उत्तर मुंबईत उत्तर भारतीय व्यक्तीला पहिल्यांदाच उमेदवारी जाहीर झाली आहे.

उत्तर मुंबईतून उमेदवारी जाहीर झाल्यानंतर, शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची देखील भेट घेऊन उत्तर मुंबई मतदारसंघात उमेदवार देऊ नका, अशी विनंती देखील करणार असल्याचे विनासिंग यांनी म्हटलं आहे. महिला आणि शिक्षण या मुद्द्यांवर निवडणूक लढवणार असल्याचं विना सिंग यांनी म्हटलं आहे.